मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » सोमवार, दि. 6 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# इच्छुकांचे लक्ष अंतिम प्रभाग रचनेवर

## अंतिम प्रभाग रचनेला आज मुहूर्त का?

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचे वारे सुरु झाले असून, अंतिम प्रभाग रचना कधी जाहिर होते यावर चर्चा अन् इच्छुकांचे लक्ष लागले आहे. अंतिम प्रभाग रचना सोमवारी (ता. ६) जाहीर होऊ शकते. त्यामुळे प्रारूप प्रभाग रचनेवर घेतलेल्या ३१८ पैकी कितीहरकती व सूचनांचा स्वीकार झाला आहे? कोणत्या प्रभागात बदल होईल? अंतिम प्रभाग रचना कशी असेल? कोणत्या राजकीय पक्षासाठी अनुकूल असेल? याबाबत इच्छुकांमध्ये धाकधूक वाढली आहे.

नोंदवलेल्या ३१८ हरकती-सूचनांनुसार बदलाची अपेक्षाही त्यांना आहे. महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने एप्रिलमध्ये दिला. त्यानंतर चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे निवडणूक घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार प्रभाग रचना तयार करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेच्या निवडणूक विभागाला दिला. त्याप्रमाणे प्रशासनाने ३२ प्रभागांतील १२८ जागांसाठी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा तयार करून राज्य नगरविकास विभागाला सादर केला होता. नागरिकांच्या हरकती व सूचनांसाठी तो २२ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला. त्यावर चार सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या होत्या. प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच असल्याने अनेकांचा जीव भांड्यात पडला. मात्र, तरीही ३१८ हरकती व सूचना नोंदवल्या गेल्या आहेत. त्यावर सुनावणी होऊन नगरविकास विभागाला प्रारूप प्रभाग रचना अंतिम मान्यतेसाठी पाठवली आहे. निवडणूक आयोगाच्या नियोजित वेळापत्रकानुसार तीन ते सहा ऑक्टोबर या चार दिवसांत अंतिम प्रभाग रचना जाहीर होणे अपेक्षित आहे. त्यातील तीन दिवस संपले आहेत. सोमवार (ता. ६) शेवटचा दिवस आहे. शिवाय, शनिवारी (ता. ४) पुणे महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर झाली आहे. त्यामुळे सोमवारी पिंपरी चिंचवड महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर होईल. त्याकडे सर्व इच्छुकांचे विशेषत हरकती व सूचना मांडलेल्यांचे लक्ष लागले आहे.



### प्रारूप रचनेतील उल्लेखनीय प्रभाग आणि लोकसंख्या

- सर्वाधिक लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ९ : नेहरूनगर-मासुळकर कॉलनी : ५९,३९०
- सर्वांत कमी लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ५ : भोसरी-गवळीनगर-चक्रपाणी वसाहत : ४९,०४९
- सर्वाधिक अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १३ : निगडी-यमुनानगर : १५,७७०
- सर्वांत कमी अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १५ : आकुर्डी प्राधिकरण : ३,३९१
- सर्वाधिक अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग ४ : दिघी-बोपखेल : ४,२८६
- सर्वांत कमी अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग १९ : एम्पायर इस्टेट चिंचवड स्टेशन : ३८९

### पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार)

- एकूण : १७,२७,६९२
- अनुसूचित जाती : २,७३,८१०
- अनुसूचित जमाती : ३६,५३५

### एकूण हरकती ३१८; प्रत्यक्षात सहा

- प्रभाग एकमध्ये ८६ अर्जदार आणि १२ अर्जदारांची हरकत एकसारखी होती. म्हणजेच सर्व मिळून दोन हरकती होत्या
- प्रभाग १० मध्ये ५२ अर्जदार, ३८ अर्जदार आणि २२ अर्जदारांच्या हरकत एकसारख्या होत्या. म्हणजेच सर्व मिळून तीन हरकती होत्या.
- प्रभाग २० मध्ये २९ अर्जदारांची हरकत एकसारखी होती. म्हणजेच सर्व मिळून एकच हरकत होती.

> महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचनेला अद्याप मान्यता मिळालेली नाही. सोमवारी मान्यता मिळण्याची शक्यता आहे. मान्यता मिळाल्यानंतर प्रभाग रचना जाहीर केली जाईल.
>
> \- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, निवडणूक विभाग, महापालिका

# थेरगावातील ग्रेड सेपरेटरची लांबी वाढवा; खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचना

## थेरगाव गावठाणकडे जाणारी वाहतूक सुरळीत करावी अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिल्या.

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगाव डांगे चौक परिसरात वाहतूक कोंडी वाढली आहे. सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. ही कोंडी सोडवण्यासाठी ग्रेड सेपरेटरची लांबी वाढवावी. थेरगाव गावठाणकडे जाणारी वाहतूक सुरळीत करावी अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिल्या.

थेरगाव परिसरातील वाहतूक नियोजनाबाबत खासदार बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी महापालिकेच्या विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, स्थापत्य प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता विजय भोजणे, शहरी दळणवळण विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील पवार, दळणवळण



विभागाचे कनिष्ठ अभियंता गिरीश गुठे, प्रकल्प सल्लागार राज अंतुर्लीकर, माजी नगरसेवक निलेश बारणे उपस्थित होते.

थेरगावमधील डांगे चौक अतिशय वर्दळीचा आहे. या चौकातून आयटीनगरी हिंजवडी, पुण्याकडे जाणारी वाहतूक जाते. त्यामुळे चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्यावेळी वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. कोंडीमुळे अभियंत्यांना विलंब होतो. त्याचा कामावर परिणाम होत आहे. थेरगाव गावठाणकडे जाणाऱ्या रस्त्यावर देखील अशीच परिस्थिती असते. त्यामुळे हा परिसर कोंडीमुक्त करणे आवश्यक आहे. थेरगाव डांगे चौक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता ग्रेड सेपरेटरची लांबी वाढवावी. वाहतूक कोंडी सोडविण्याची सूचना खासदार बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# विधायक उपक्रमांनी नगरसेविका नम्रता लोंढे यांचा वाढदिवस साजरा

## पूरग्रस्तांना मदत करून जपली सामाजिक बांधिलकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पूरग्रस्तांना मदत...पांजरपोळ येथे गायींना चारा...परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान... महिलांसाठी विविध स्पर्धा... नवरात्रोत्सव बक्षीस वितरण... महाराष्ट्राचे लोकप्रिय गायक श्री अवधूत जी गांधी यांचा लाईव्ह कॉन्सर्ट... महाराष्ट्राची प्रसिद्ध नृत्यांगणा राधा पाटील यांचा नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांनी मा.नगरसेविका नम्रता लोंढे यांचा वाढदिवस साजरा कऱण्यात आला. प्रभागातील नागरिकांनी आशिर्वाद देण्यासाठी अन् वाढदिवस साजरा कऱण्यासाठी तुफान गर्दी केली होती. नगरसेविका नम्रता लोंढे यांनी आमदार महेश दादा लांडगे यांच्या आव्हानाला साद देत एक हजार कुटूंबियांसाठी अन्नधान्य व अत्यावश्यक किट रवाना केले. पांजरपोळ येथील गायींना चारा देऊन सकाळची सुरुवात केली. आपला परिसर स्वच्छ सुंदर ठेवणाऱ्या १८० महिला कर्मचाऱ्यांना साडीचोळी देऊन सन्मानित केले.







नवरात्रोत्सवातील विजेत्यांनाही यावेळी बक्षीस वितरण केले. कार्यक्रमा दरम्यान महाराष्ट्राचे लोकप्रिय गायक श्री अवधूत जी गांधी यांचा लाईव्ह कॉन्सर्ट व महाराष्ट्राची प्रसिध्द नृत्यांगणा राधा पाटील यांचा नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित केलेल्या नवरात्रौत्सव 2025 चा बक्षीस समारंभ पार पडला त्यामध्ये प्रथम क्रमांकास ई व्ही स्कूटर,व्दितीय क्रमांकास फ्रिज,तृतीय क्रमांक : एल ई डी टी व्ही,चतुर्थ क्रमांक : वॉशिंग मशिन, पाचवा क्रमांक : पिठाची गिरणी अशी बक्षिसे विजेत्यांना देण्यात आली. तसेच प्रभागातील कुमारी भाविका मनोज आहिरे हिची अंडर 19 भारतीय क्रिकेट संघ वर्ल्ड कप स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

### मंगळागौर स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

» महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी नगरसेविका नम्रता लोंढे यांच्यातर्फे मंगळागौर स्पर्धा, गौरी गणपती सजावट स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेला प्रभागातून भरभरून प्रतिसाद मिळतो. स्पर्धेतील विजेत्यांना वाढदिवसानिमित्त बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक वसंत लोंढे,ज्येष्ठ नगरसेवक सुरेश म्हेत्रे,भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे पुणे जिल्ह्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष गणेश कवडे, मार्गदर्शक तथा उद्योजक कार्तिक लांडगे,नाना नानी पार्क मित्र मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रासकर,प्रसिद्ध उद्योजक प्रताप मोहिते,भोसरी एम आय डी सी पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक गणेश जामदार , प्रसिद्ध उद्योजक जालिंदर कातकडे,सा. कार्यकर्ते संदीपान झोंबाडे,सा कार्यकर्ते संतोष निसर्गंध यांच्यासह प्रभागातील नागरिक , कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



# एक हजारहून अधिक कुटूंबांना अन्नधान्यासह मेडिकल किटची व्यवस्था

## वर्णेकर युनिव्हर्सल फाऊंडेशन अन् रूपीनगर तळवडे मित्रपरिवाची सामाजिक बांधिलकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळवडे- मराठवाडा- सोलापूर परिसरामधील पूरग्रस्त कुटूंबियांना शहरातील विविध भागांतून मदतीचा ओघ सुरु आहे. अनेकजण माणुसकी अन् सामाजिक बांधिलकी जपत अत्यावश्यक साहित्य पाठवत आहेत. तळवडेमधून वर्णेकर युनिव्हर्सल फाऊंडेश आणि रूपीनगर तळवडे मित्रपरिवारातर्फे सोलापूरमधील पूरग्रस्त बाधित लोकांसाठी अन्नधान्य आणि मेडिकल किट व्यवस्था केली आहे. पूरग्रस्त कुटूंबियांची दिवाळी गोड व्हावी ही सामाजिक बांधिलकी या फाऊंडेशनने जपली आहे. असा आदर्श सर्वांनी घेऊन मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे






. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह सोलापूरमधील शेतकऱ्यांना पूरपरिस्थितीला सामोरे जावे लागले आहे. अनेकांचे संसार, शेती, जणावरे पुरामध्ये वाहून गेले. आयुष्यभर कष्ट करून उभा केलेला संसार क्षणामध्ये नाहीसा झाला. अशा परिस्थितीमध्ये माणुसकी व सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. हीच सामाजिक बांधिलक रूपीनगर तळवडे परिसरातील व वर्णेकर फाऊंडेशनचे सर्व सहकारी मित्र आणि एक गणेश मंडळ, प्रतिष्ठआन व सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन एक हजार कुटूंबियांना मदतीचा हात देत परिवाराची जबाबदारी स्वीकारली आहे. श्रीकृष्ण मंदिर अहिल्या देवी होळकर प्रतिष्ठान, भीम क्रांती सामाजिक संस्था, श्री गणेश मित्र मंडळ, विरोचन बुद्ध विहार, यंग पावर क्लब तसेच अर्जुन पवार शामकांत सातपुते, रवी शेत संधी पंढरी सेठ गरुड, विशाल मानकरी शिरीष भाऊ उतेकर, संदीप जी जाधव, शंतनू भालेकर,या मान्यवरांनी व रुपीनगर तळवडे मधील अनेक ग्रामस्थांना यामध्ये सहभाग होता. सदर मदत ही सोलापूर जिल्हाधिकारी तसेच सोलापूर पोलीस अधीक्षक व तहसीलदार यांच्या मार्गदर्शनामध्ये सोलापूर मध्ये गरजू व बिकट परिस्थितीत असलेल्या परिवारापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले.

# तळवडेत नवरात्रोत्सवानिमित्त रासगरबा दांडियास उत्स्फूर्त प्रतिसाद

## शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त मा.नगरसेवक प्रवीण भालेकर युवा मंचतर्फे भव्य रासगरबा व दांडियाचे आयोजन करण्यात आले होते

**तळवडे | प्रतिनिधी**

ढोलीडा... गरबे की रात, उडी उडी जाये... चो गाडा तारा, पेथल ...पूरमा अशा हिंदी चित्रपटातील गाण्यांसह यंदा गरबा रास दांडियात मराठी गाण्यांचा रिमिक्सवर तळवडेतील तरूणाईने ठेका धरला होता. शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त मा.नगरसेवक प्रवीण भालेकर युवा मंचतर्फे भव्य रासगरबा व दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जेष्ठ नागरिकांचा सन्मान, विशेष गौरव सोहळा करण्यात आला. रासगरबा व दांडियाच्या कार्यक्रमास सर्वांना प्रोत्साहित करण्यासाठी सिनिअभिनेत्री गायत्री दातार,पौर्णिमा डे तसेच पूजा बिरारी यांची उपस्थिती आकर्षणीय ठरली. तळवडे परिसरातील नागरिकांनी या उपक्रमास तुफान गर्दी केली होती.

पारंपरिक गुजराती गीतांवर गरबा अन् दांडियाचा कार्यक्रम रंगला, त्यात नॉनस्टॉप बॉलिवूड गाण्यांचा तडका असे समीकरण पाहायला मिळत आहे.पारंपरिक वेशभूषेत दांडिया गीतांवर थिरकरणारे तरुण-तरुणी, गरबा करणारे पुरुष अन् वैविध्यपूर्ण वेशभूषेत मैत्रिणींबरोबर दांडियात सहभागी झालेल्या महिला अशा आनंदी वातावरण पहायला मिळाले. विविध गटांनी आकर्षक नृत्य सादर केले. परीक्षकांच्या उपस्थितीत विजेत्यांची निवड करून बक्षीस वितरण नगरसेवक प्रवीण भालेकर व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



### ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

» नवरात्रीचे औचित्य साधून परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा चांदीची प्रतिमा,शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. जेष्ठांनी नगरसेवक प्रवीण भालेकर यांच्या कार्याबद्दल कौतुक केले. भविष्यातही असेच कार्य करत रहा अशा शुभेच्छाही दिल्या. यावेळी नगरसेवक प्रवीण भालेकर म्हणाले की,"गरबा-दांडिया उत्सव समाजात ऐक्य व परंपरा जपतो . परिसरामध्ये हेच ऐक्य साधण्यासाठी असे उपक्रम आवश्यक असतात. त्यासाठी आपण रासगरबा व दांडियाचे नियोजन केले.तसेच ज्येष्ठ नागरिकांचा आदर सन्मान करणे ही आपली कर्तव्यभावना आहे. ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन समाजाला बळकटी देतात."

### यावेळी तळवडे विविध कार्यकारी सोसायटीचा विशेष सन्मान

» हवेली तालुक्यामध्ये उत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल तळवडे विविध कार्यकारी सोसायटीला राज्याचे कृषी मंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते पारितोषिक मिळाले. सोसायटीचे चेअरमन श्री. गोपाळ तात्या भालेकर व सर्व संचालकांचा विशेष सन्मान नगरसेवक प्रविणशेठ भालेकर युवा मंचाच्या वतीने शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त करण्यात आला.

### विजेत्यांची यादी पुढीलप्रमाणे

- » मोठा गट (ग्रुप परफॉर्मन्स)
- » प्रथम क्रमांक : ऐश्वर्या देशमुख
- » व्दितीय क्रमांक : ऋतुजा पाटेकर
- » तृतीय क्रमांक : संस्कृती जाधव, कृष्णा नांगरे, दिनेश खताळ, सौरभ चाटसे, विवेक हजारे

### लहान गट (ग्रुप परफॉर्मन्स)

- » मयुरी ढोरे
- » आरोही यादव
- » श्रेया शिंदे
- » आरोही शिंदे
- » पियुष गरड
- » साक्षी कवडे

### नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

» उत्सवात परिसरातील तरुणाई, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी पारंपरिक वातावरणात नवरात्र उत्सव साजरा करत एकतेचा व संस्कृतीचा संदेश दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा मंचातील पदाधिकारी व सहकार्यांनी परिश्रम घेतले.



# नवरात्रोत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्तांना मदत

## भोसरीतील वीर छत्रपती संभाजीराजे मंडळाध्यक्षा कविता भोंगाळे यांचा पुढाकार

**भोसरी | प्रतिनिधी**

मराठवाड्यासह सोलापूरमध्ये भयानक पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अनेकांचे संसार, गुरे वाहून गेले आहेत. पूरग्रस्तांना मानवतेच्या दृष्टीकोनातून मदत करणे ही सामाजिक बांधिलकी आहे. हीच जाणीव ठेवून भोसरीतील वीर छत्रपती संभाजीराजे नवरात्र उत्सव मंडळाने मराठवाड्यासाठी अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू देण्याचा निर्णय नवरात्रोत्सवात घेऊन एक सामाजिक दायित्व निभावले आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या आवाहनाला साद देत मंडळाच्या अध्यक्षा कविता भोंगाळे व आयोजक किरण फुगे यांनी पुढाकार घेत हा अनोखा उपक्रम राबविला.

उत्सवाची सुरुवात पवित्र विधींसह घटस्थापनेने झाली. नित्याने सकाळी देवी पूजन, सप्तशती पठण, व संध्याकाळी आरती यामुळे संत तुकारामनगर भोसरी परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. संध्याकाळी परिसरातील नागरिकांच्या सहभागाने देवीच्या आरत्या, दांडिया-गरबा अशा कार्यक्रमांनी वातावरण अधिकच उत्साहवर्धक झाले होते. ...या गाण्यांवर थिरकली तरूणाई ढोलीडा, गरबे की रात, उडी उडी जाये, चो गाडा तारा, पेथल पूरमा अशा हिंदी चित्रपटातील गाण्यांसह यंदा गरबा रास दांडियात मराठी गाण्यांचा रिमिक्स गाण्यांची धूम दिसून आली. दांडिया, गरबामध्ये हिंदी, राजस्थानी व गुजराथी भाषेतील गाण्यांसह मराठी गाण्यांनाही तरुणाईने पसंती दिल्याचे दिसून आले. त्यामध्ये धर्मवीर चित्रपटातील 'अष्टमी', तमाशा लाईव्ह मधील 'रंग लागला', तू ही रे मधील 'गुलाबाची कळी', वंशवेलमधील 'अंबे कृपा करी', चंद्रमुखीमधील टायटल साँग, सख्या सजना ही नवी गाणी तसेच मी हाय कोळी, ठाकर वाडी, राधिका रे, चल गं पारू या पारंपरिक गाण्यांवर तरुणाई बेधुंद होऊन थिरकताना दिसून आली.





या उपक्रमास मार्गदर्शक म्हणून पै.किसनराव लांडगे (आमदार महेशदादा लांडगे यांचे वडील), आदर्श उद्योजक विनायकराव भोंगाळे आहेत. यावेळी शिवाजंली सखी मंचच्या अध्यक्षा पूजाताई महेशदादा लांडगे, प्रज्ञाताई कार्तिक लांडगे, स्नेहा मयूरदादा लांडगे, राणी उर्फ माई अशोक तात्या पठारे, श्वेता किरणशेठ फुगे, सुजाता विशाल महाराज फुगे, योगिता गणेश लांडगे, हर्षदा ताई भानुदास लांडगे, वंदना राजूभाऊ जाधव,संतोष महाराज लांडगे, सुभाष भाऊ राक्षे, निलेश मारणे, मिलिंद पाटील, सौरभ सुहास इंगवले, प्रशांत माळी, बाळासाहेब पिलाजी गवळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक छत्रपती संभाजी महाराज मित्र मंडळाचे अध्यक्ष पै.किरणशेठ गजानन फुगे यांनी केले होते

### दांडिया स्पर्धेतील विजेते

» दांडिया स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्या वर्षा राठोड , व्दितीय क्रमांकाच्या विजेत्या दीक्षा प्रकाश साळवी , तृतीय क्रमांकाचे विजेत्या नेहा नागेश माडेकर तसेच सहभागी महिलाना मोठ्या प्रमाणात मंडळाच्या अध्यक्षा कविता भोंगाळे-कड्डू पाटील यांच्याकडून पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. महिलांसाठी मंगळागौर, तर बालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्र उत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता समाजोपयोगी कार्याचा एक महत्त्वाचा सोहळा ठरावा, यासाठी मंडळातर्फे दरवर्षी रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य तपासणी, वृक्षारोपण मोहीम, स्वच्छता अभियान ईत्यादी उपक्रम राबविण्यात येत असतात. यंदाही हे उपक्रम पार पडले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यंदा मंडळाची आरास आणि देवी सजावट विशेष आकर्षण ठरणार आहे. रंगीबेरंगी फुलांनी, विद्युत रोषणाईने सजवलेल्या मंडपामुळे परिसर चैतन्यमय झाला आहे.

# अजितदादांच्या नाराजीनंतर पुणे महापालिकेच्या प्रभाग रचनेत बदल !

## हडपसर, खडकवासला आणि वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांतील प्रभागांमध्ये काही बदल करून दिलासा देण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीची अंतिम प्रभागरचना नुकतीच जाहीर करण्यात आली. महापालिकेने तयार केलेल्या प्रारूप प्रभागरचनेतील काही प्रभागांमध्ये बदल करून अंतिम प्रभागरचना करण्यात आली. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार ) पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्यांची ताकद असलेल्या काही प्रभागांमध्ये बदल करून पवार यांना खुश करण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आला आहे.



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद असलेल्या हडपसर, खडकवासला आणि वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांतील प्रभागांमध्ये काही बदल करून दिलासा देण्यात आला आहे. राज्यात महायुतीमध्ये सत्ताधारी असलेल्या आणि भाजपचे मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी प्रभागरचना केल्याचा आरोप करण्यात आला होता.

मित्रपक्ष असतानाही शहरातील ज्या प्रभागात उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची ताकद अधिक आहे, त्या प्रभागांचीही तोडफोड करून रचना करण्यात आल्याचा आरोप होता. महापालिकेच्या प्रभागरचनेवर भाजपचेच वर्चस्व असल्याचे अंतिम प्रभाग रचनेवरून स्पष्ट झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रारूप प्रभागरचनेवर जाहीर नाराजी व्यक्त केल्यानंतर महायुतीतील मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्राबल्य असलेल्या खडकवासला, वडगाव शेरी आणि हडपसर या विधानसभा मतदारसंघांतील काही प्रभागांमध्ये अंशत: बदल करून 'राष्ट्रवादी'चे समाधान करण्यात आले आहे.

महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत ज्या भागातून राष्ट्रवादीच्या तसेच शिवसेनेच्या उमेदवारांना मोठे मताधिक्य मिळाले, तो भाग तोडून दुसऱ्या प्रभागात जोडून या दोन्ही पक्षांवर भाजपने कुरघोडी केली होती. या प्रकारानंतर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. त्यानंतर अंतिम प्रभागरचना करताना हरकती, सूचनांचा आधार घेऊन हडपसर, खडकवासला, वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील काही प्रभागात बदल करण्यात आले आहेत.

महापालिकेने तयार केलेल्या प्रारूप प्रभागरचनेतील काही प्रभागांमध्ये बदल करून अंतिम प्रभागरचना करण्यात आली. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार ) पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्यांची ताकद असलेल्या काही प्रभागांमध्ये बदल करून पवार यांना खुश करण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आला आहे.

### मध्यवर्ती पेठांमधील हरकती, सूचनांकडे दुर्लक्ष

**» शहराच्या मध्यवर्ती पेठांच्या भागात भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व आहे. येथील प्रभागरचना भाजपला फायद्याची ठरेल, अशी करण्यात आली आहे. मात्र, हे करताना आरक्षणात बदल होईल, अशा पद्धतीने ठरावीक भाग तोडून दुसऱ्या प्रभागात जोडला आहे. कसबा, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील प्रभागांमध्ये हा प्रकार करण्यात आला आहे. त्यावर हरकती नोंदविण्यात आल्या. मात्र, अंतिम प्रभागरचनेत मध्यवर्ती पेठांच्या प्रभागांमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.**

# 'जायका' प्रकल्पात गंभीर गैरव्यवहाराचा आरोप; महापालिका अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद!

## 915 कोटींच्या नदी शुद्धीकरण प्रकल्पावर प्रश्नचिन्ह; 'आपले पुणे आपला परिसर' संस्थेची चौकशी व कारवाईची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

नदीचे पाणी शुद्ध करण्यासाठी जायकामार्फत पुणे महापालिकेला तत्कालीन पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांच्या पाठपुराव्यामुळे तब्बल 915 कोटी रुपयांचा प्रकल्प मिळाला होता. या प्रकल्पाची परतफेड केंद्र सरकारकडून होणार असल्याची तरतूद होती

या प्रकल्पात महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सल्लागार आणि कंत्राटदारांच्या संगनमताने गंभीर गैरव्यवहार केल्याचा आरोप 'आपले पुणे आपला परिसर' संस्थेचे पदाधिकारी व माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी केला आहे. यासंदर्भात चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे.



संस्थेने सांगितले की, या प्रकल्पातील जवळपास 600 कोटी रुपये इमारतींच्या बांधकामावर खर्च करण्यात आले, मात्र त्या ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याचे महत्त्वाचे कामच राहून गेले. यामुळे समाधानकारक परिणाम न मिळाल्याने पुन्हा एकदा नदी स्वच्छतेच्या नावाखाली केंद्र, राज्य, महापालिका आणि कंत्राटदार यांच्या सहभागातून आणखी एक महाप्रकल्प राबविण्याची तयारी सुरू आहे.

भैरोबानाला येथे 130 एमएलडी क्षमतेचा प्रकल्प आधीपासून असतानाही त्याच ठिकाणी जायकातून 75 एमएलडीचा प्रकल्प सुरू करण्यात आला. मात्र तो अद्याप अर्धवट अवस्थेत आहे.

याशिवाय, या प्रकल्पाऐवजी फक्त भैरोबानाला पाडून 70 एमएलडीची वाढ करणे आणि 388 कोटी रुपयांचा बायोगॅस प्रकल्प उभारणे असा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठी सल्लागाराला तब्बल 30 कोटी रुपयांची फी देण्यात येणार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

उज्ज्वल केसकर यांनी प्रश्न उपस्थित केला की, बीओडी लेव्हल पुण्यात आवश्यक तेवढीच नसताना बायोगॅस प्रकल्प उभारण्याचा हट्ट का? बायोगॅस प्रकल्प यशस्वी होण्यासाठी 350 ते 400 एमजी/एल पेक्षा जास्त बिओडी लेव्हल आवश्यक असते. मात्र पुण्यात ती 180 एमजी/एलपेक्षाही कमी आहे. तरीदेखील 288 कोटी रुपयांचा खर्च करण्याचा घाट का घातला जात आहे, हे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना समजत नाही का, असा सवाल त्यांनी केला.

पुण्यात आजवर एकही बायोगॅस प्रकल्प यशस्वी झाला नाही, सर्वच बंद करावे लागले आहेत, हे वास्तव असतानाही पुन्हा कोट्यवधी खर्च करून तसाच प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न म्हणजे जनतेच्या पैशांचा अपव्यय असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे.

### कारवाईची मागणी

**» प्रशांत बधे म्हणाले की, "नदी शुद्धीकरणासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च होत आहेत. मात्र नदी खरोखरच स्वच्छ होईल का, हा मूलभूत प्रश्न आहे. केंद्र, राज्य, महापालिका या सर्वांचा निधी म्हणजेच जनतेचा पैसा आहे. तो प्रामाणिकपणे, योग्य उद्देशासाठी खर्च होणे आवश्यक आहे. पण येथे तसे दिसत नाही. त्यामुळे आयुक्तांनी या संपूर्ण प्रकल्पाचा सखोल तपास करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी," अशी मागणी केली आहे.**